महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

मासं/रवका/न.क्र.६६४
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmhrmsedcl@gmail.com
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. ०२२ - ६९४२५१

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ६९६ दिनांक २३ / ०७ / २०२५

**विषय :** नक्षलग्रस्त भागात कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात येत असलेल्या सोयी-सवलतीबाबत.

**संदर्भ :** १. सामान्य आदेश क्र.१२०(क) दि.०१.०७.१९८९.
२. प्रशासकीय परिपत्रक क्र.३७८ दि.२९.०१.२००३.
३. प्रशासकीय परिपत्रक क्र.५०३ दि.२६.०३.२०१५.
४. परिपत्रक क्र.मासं/रवका/न.क्र.६६४/२००८२ दि.१७.०४.२०१५.
५. शासन निर्णय क्र. एनएएक्स १२२०/प्र.क्र.२५३/विशा १ ब दि.२७.०६.२०२५

-----

सामान्य आदेश क्र.१२०(क) दि.०१.०७.१९८९ मधील तरतुदींनुसार नक्षलग्रस्त/आदिवासी भागात कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना विविध सोयी-सवलती लागू करण्यात आलेल्या आहेत. तसेच शासनाने वेळोवेळी या संदर्भात जाहीर केलेल्या धोरणानुसार त्यात वाढ/ बदल/सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

२. आता, गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांनी पारित केलेल्या शासन निर्णय क्र. एनएएक्स १२२०/ प्र.क्र.२५३/विशा १ ब दि.२७.०६.२०२५ अन्वये राज्यातील यापूर्वी घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागांचा आढावा घेऊन खालीलप्रमाणे सुधारीत नक्षलग्रस्त भाग घोषित केलेले आहेत.

| अ.क्र. | जिल्हा | जिल्हयातील तालुके |
|---|---|---|
| १ | गडचिरोली | संपूर्ण जिल्हा |
| २ | गोंदिया | गोंदिया, सालेकसा, देवरी व अर्जुनी मोरगाव |

३. शासनाने उपरोक्तपणे पारित केलेल्या सूचनांच्या धर्तीवर सदर भागांमध्ये कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना पुरविण्यात येणाऱ्या सोयी-सवलती अनुज्ञेय करण्याची बाब विचाराधीन होती. या अनुषंगाने शासन निर्णय दि.२७.०६.२०२५ च्या धर्तीवर गडचिरोली संपूर्ण जिल्हा आणि गोंदिया जिल्हयातील गोंदिया, सालेकसा, देवरी व अर्जुनी मोरगांव या तालुक्यांतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना यापूर्वी पुरविण्यात आलेल्या सोयी- सवलती यापुढेही सुरू ठेवण्याबाबत सक्षम अधिकारी यांनी मंजुरी प्रदान केली आहे.

४. तसेच, गोंदिया जिल्हयातील सडक अर्जुनी तालुका आणि चंद्रपूर, यवतमाळ, भंडारा, नांदेड या जिल्हयांतर्गत यापूर्वी घोषित केलेले तालुके/गांवे शासन निर्णय दि.२७.०६.२०२५ मध्ये समाविष्ट नसल्याने नक्षलग्रस्त भागाकरीता पुरविण्यात आलेल्या सोयी-सवलती सदर जिल्हा/तालुक्यांतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना लागू ठरत नाहीत.

५. सबब, शासन निर्णय दि.२७.०६.२०२५ अन्वये नक्षलग्रस्त भागांमधून वगळण्यात आलेल्या तालुके/गावांमध्ये कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना यापूर्वी देण्यात येणाऱ्या संबंधित सोयी-सवलती माहे जुलै २०२५ पासून देय असणार नाहीत.

६. सर्व संबंधित नियंत्रण अधिकारी यांनी उपरोक्त सूचनांचे अवलोकन करून त्या अनुषंगाने आपापल्या नियंत्रणाखालील कार्यालयामध्ये अंमलबजावणीकरीता त्वरीत कार्यवाही करावी.

७. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**सोबत:** शासन निर्णय दि.२७.०६.२०२५.

**( भूषण कुलकर्णी )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(मासं)/(प्रकल्प)/(वाणिज्य) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (वित्त व लेखा)/(वितरण)/(पायाभूत आराखडा/विशेष प्रकल्प)/(मासं)/(सुवअं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण)/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी सल्लागार/मुख्य तपास अधिकारी/ कंपनी सचिव म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई. (सांघिक कार्यालय/क्षेत्रीय कार्यालय)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**राज्यातील सुधारित नक्षलग्रस्त भाग घोषित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- एनएएक्स-१२२०/प्र.क्र.२५३/वि.शा.१ब**
दुसरा मजला, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई- ३२.
दिनांक : २७ जून, २०२५.

**वाचा :-**

१) शासन निर्णय क्र. एनएएक्स- २००४/प्र.क्र. ४८/विशा-१ब , दि. ७/१२/२००४.
२) शासन निर्णय क्र. एनएएक्स- २००५/प्र.क्र. १४/विशा-१ब , दि. २०/५/२००५.
३) शासन निर्णय क्र. एनएएक्स- ०९१२/प्र.क्र. ३६९/विशा-१ब , दि. ४/२/२०१३.
४) शासन निर्णय क्र. एनएएक्स- ०९१२/प्र.क्र. ३६९/विशा-१ब , दि. ५/४/२०१३.
५) शासन निर्णय क्र. एनएएक्स- ०९१२/प्र.क्र. ३६९/विशा-१ब , दि. २६/१२/२०१४.
६) शासन निर्णय क्र. एनएएक्स- ०९१२/प्र.क्र. ३६९/विशा-१ब , दि. १८/२/२०१५.
७) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. पोमंस/२१ अ/१९५/नक्षलग्रस्त भाग/१५८/२००७, दि. २९/०६/२०२२.

**प्रस्तावना-**

राज्यातील काही भागांमध्ये नक्षलवाद्यांच्या कारवाया वाढल्याने शासन निर्णय दि. ७/१२/२००४ व दि. २०/५/२००५ अन्वये राज्यातील जिल्हे, तालुके, गावे नक्षलग्रस्त म्हणून घोषित करण्यात आली होती. मात्र आढाव्याअंती सदर दोन्ही शासन निर्णय उपरोक्त दि. ४/२/२०१३ च्या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करुन नव्याने नक्षलग्रस्त जिल्हे व तालुके घोषित करण्यात आले होते. तदनंतर सदर शासन निर्णयास दि. ५/४/२०१३ च्या शासन निर्णयान्वये पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती दिलेली होती. त्यानंतर दि. २६/१२/२०१४ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील जिल्हे, तालुके, गावे नक्षलग्रस्त म्हणून घोषित करण्यात आली होती. तथापि, सदर शासन निर्णयास उपरोक्त दि. १८/२/२०१५ च्या शासन निर्णयान्वये पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती दिलेली आहे.

राज्यातील आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना विविध आर्थिक लाभाच्या व बिगर आर्थिक लाभाच्या सवलती लागू करण्यात आलेल्या आहेत. या सवलतीमध्ये कालानुरुप बदल करुन शासन निर्णय दि. ७/१२/२००४ व दि. २०/५/२००५ अन्वये घोषित केलेले नक्षलग्रस्त भाग विचारात घेऊन सुधारित सवलतींचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाने मंत्रीमंडळ मान्यतेसाठी दि. ५/११/२०२१ च्या मंत्रीमंडळ बैठकीत सादर केला होता. सदर बैठकीत केंद्र शासनाच्या नक्षलग्रस्त भागाच्या यादीनुसार तपासणी करुन नक्षलग्रस्त भागाचा फेरविचार करण्याच्या सूचना मंत्रीमंडळातील काही सन्माननीय सदस्यांनी दिल्या असल्याने त्यास अनुसरुन पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडून राज्यातील नक्षलग्रस्त भाग घोषित करणे बाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. त्याचा सर्वंकष विचार करून पुढीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सादर केलेल्या अहवालानुसार तसेच राज्यातील नक्षलवाद्यांच्या कारवायांची सध्याची परिस्थिती पाहता दि. ७/१२/२००४ व दि. २०/५/२००५ रोजीचे शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत असून गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यातील खालीलप्रमाणे जिल्हा/तालुके नक्षलग्रस्त म्हणून घोषित करण्यात येत आहेत.

| **अ.क्र.** | **जिल्हा** | **जिल्ह्यातील तालुके** |
|---|---|---|
| १. | गडचिरोली | संपूर्ण जिल्हा |
| २. | गोंदिया | गोंदिया, सालेकसा, देवरी व अर्जुनी मोरगांव |

२. वर नमूद केलेल्या नक्षलग्रस्त जिल्हा/तालुक्यांच्या तसेच राज्यातील इतर भागाच्या नक्षलग्रस्ततेसंदर्भात आवश्यकतेनुसार आढावा घेऊन त्यात बदल करण्यासंदर्भातील प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासनाकडे पाठवावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०६२७१४३५०६०७२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

HEMANT ANANT MAHAJAN

Digitally signed by HEMANT ANANT MAHAJAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=18b72890e049ba3219e993bae40e4fae87fba16fd8c92cbf7f96107d9c100ae1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4146B85AAA58555E80C9D75A2ABA23B993E46DF208B0B469F1B74670DC22D7FA, cn=HEMANT ANANT MAHAJAN
Date: 2025.06.27 15:08:40 +05'30'

**(हेमंत महाजन)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२. मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास,गृह निर्माण) यांचे खाजगी सचिव.
४. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
७. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद/अमरावती/नाशिक
८. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९. आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०. सर्व जिल्हाधिकारी
११. सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक
१२. विशेष पोलीस महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, नागपूर
१३. पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, नागपूर
१४. सर्व पोलीस आयुक्त
१५. सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक
१६. महालेखापाल, महाराष्ट्र (लेखापाल/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
१७. सर्व कोषागार अधिकारी
१८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१९. गृह विभागातील सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी
२०. निवड नस्ती